(10)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
स्त्री रुग्णालय बारामती जि.पुणे
(कल्याणी कॉर्नर,एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे)

०२११२ -२४४४५५
mswhbaramati@gmail.com
आरोग्यसेवा

जाक्र/स्त्रीरुबा/आयुर्वेदिक/ 83 /२०१९
दि. २/ ५ /२०१९

प्रति,
संचालक, आयुष,
आयुष संचालनालय,महाराष्ट्र राज्य मुंबई

विषयः- प्रस्तावित शासकिय आयुर्वेद महाविद्यालय,वारामती व संलग्नीत रुग्णालयाकरीता १०० रुग्ण खांटा आरक्षीत करुन मिळणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्रस्तावित शासकिय आयुर्वेद महाविद्यालय,व रुग्णालय,(१०० विद्यार्थी क्षमतेचे) बारामती जि.पुणे करीता भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार १०० रुग्ण खांटा असलेले रुग्णालय आरक्षीत असणे आवश्यक आहे.सदर प्रस्तावित आयुर्वेद महाविद्यालयासाठी शासकिय स्त्री रुग्णालय,बारामती जि.पुणे येथील १०० रुग्ण खांटा दिनांक २/५/२०१९ पासुन आरक्षित करण्यात येत आहेत.

करीता माहितीस्तव सविनय सादर

आपला विश्वासू

वैद्यकिय अधिक्षक वर्ग-१
स्त्री रुग्णालय बारामती जि.पुणे

MEDICAL SUPERINTENDENT CL-1
WOMAN HOSPITAL
BARAMATI, DIST-PUNE

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Baramati, Dist. Pune

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

YT 897365

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑

अनुक्रमांक 4228 दिनांक 21/21/2021 रुपये 100/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी खरेदी करायचा आहे करार

मुंबई मुद्रांक अधिनियम

मुद्रांक खरेदी करणाऱ्याचे नाव डॉ. अनिल किसनराव भाले

संपूर्ण पत्ता बारामती

हस्ते व्यक्तीचे नाव निखिल पवार

पत्ता

मुद्रांक खरेदीदार/हस्ते व्यक्तीची सही

स्वाक्षरी

(श्री. अनिल दिलीपराव)

परवाना क्र. २२/२०१७

परवान्याची मुदत ३१/०३/२०२४

पत्ता तहसिल कार्यालय, बारामती

उप कोषागार कार्यालय बारामती

३० AUG 2021

उपकोषागार अधिकारी

बारामती

सामंजस्य करार

Dean

Govt. Ayurved College & Hospital,

Baramati, Dist. Pune

Scanned by CamScanner

वैद्यकिय अधिक्षक (वर्ग-१), शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती (पक्ष अ) आणि अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती (पक्ष ब) या दोघामध्ये आज दि09/09/ २०२१ रोजी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून सामंजस्य करण्यात आला.

<u>सामंजस्य करार</u>

विषय:- आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती येथील १०० रुग्ण खाटा व अनुषंगिक आवश्यक इमारतीचा भाग अंशत: हस्तांतरीत करण्याबाबत.

संदर्भ: - वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. एएमसी २०२१/प्र.क्र.१४७/२१/शिक्षण-१, दि. २० जुलै २०२१

वरील संदर्भित शासन निर्णयानुसार, बारामती (पुणे) येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रुग्ण खाटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यास शासनाने आयुर्वेद महाविद्यालयाकरीता मान्यता दिली आहे. केंद्र शासन व भारतीय केंद्रीय चिकीत्सा परीषद, नवी दिल्ली /भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार १०० खाटांचे आयुर्वेद रुग्णालय असणे आवश्यक आहे.

यास्तव, आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती येथील १०० रुग्ण खाटा व तसेच अनुषंगिक इमारतीचा भाग हा नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित रुग्णालय यांना विद्यार्थ्यांच्या रुग्णालयीन प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विनाशुल्क दि. ०२.०५.२०१९ पासून वापर करण्यास देण्यात आली आहे.

... College & Hospital
..., Dist. Pune

Scanned by CamScanner

१)	शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती येथील १०० रुग्ण खाटा व अनुषंगिक इमारतीचा भाग हस्तांतरीत करण्यात येत आहे. जरी हस्तांतरीत झाला, तरी इमारत व जागेचा ताबा हे वैद्यकिय अधिक्षक, शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती यांचे नावावरच राहिल. त्यात कोणताही बदल होणार नाही.

२)	सदर करार हा दि. ०२.०५.२०१९ पासून ०७ वर्षे अथवा शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे स्वतंत्र शासकीय आयुर्वेद रुग्णालय पुर्ण स्थापन होईपर्यंतच्या कालावधीकरीता असेल.

३)	वैद्यकिय अधिक्षक, शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती त्यांच्या पसंतीने (सोईनुसार) जागेची निवड करुन, अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांना अंशत: हस्तांतरीत करतील. सदर हस्तांतरीत जागा करार चालु असेपर्यंत, अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहील. दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी तसेच शासकीय आयुर्वेद रुग्णालयाच्या अधिष्ठाता कार्यालयाकरिता व्यवस्था करण्यात येईल.

४)	अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय यांना इमारतीच्या मूळ रचनेत काही फेरफार करावयाचे असल्यास, त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाची (प्रशासनीक विभाग) यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. इमारतीच्या मुळ संरचनेमध्ये बदल करता येणार नाही परंतु, आवश्यकतेनुसार भारतीय केंद्रीय चिकीत्सा परीषद, नवी दिल्ली / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांचे परवानगीसाठी त्यांच्या मानाकांप्रमाणे रुग्णालय इमारतीमध्ये फेरबदल करणे आवश्यक असल्यास, वैद्यकिय अधिक्षक, शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती यांचे मार्फत शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून तसा प्रस्ताव शासनास सादर केला जाईल व शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतरच फेरबदल केले जातील व त्याकरीता सहकार्य करावे. त्याचबरोबर मानकाप्रमाणे आंतरीक बदल करावयाचे झाल्यास वैद्यकिय अधिक्षक यांची सहमती राहील.

५)	दैनंदिन रुग्णालयीन कामकाज सुरळीत चालण्यासाठी भारतीय केंद्रीय चिकीत्सा परीषद, नवी दिल्ली /भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली मानकांप्रमाणे आवश्यक कर्मचारीवृंद हे शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती या कार्यालयामध्ये सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या, अधिकारी / वर्ग क व वर्ग ड कर्मचारी तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध शासकीय योजनेंतर्गत कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार शासकीय आयुर्वेद रुग्णालय येथे कार्यालयीन व रुग्णालयीन कामकाजाकरीता, सेवा घेण्यात येईल आणि त्यांचे वेतन हे नियमितप्रमाणे शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती देईल.

Dean
Govt. Ayurved College & Hospital
Dist. Pune

Scanned by CamScanner

६)	महाराष्ट्र शासन, भारतीय केंद्रिय चिकित्सा परीषद, नवी दिल्ली (CCIM) / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (MUHS) यांचे स्तरावरुन रुग्णालयाचे वेळोवेळी होणाऱ्या परीक्षणाच्या (Inspection /Surprise Inspection) दरम्यान वैद्यकिय अधिक्षक, शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती सहकार्य करतील.

७)	हॉस्पिटलच्या दर्शनी भागात "शासकीय आयुर्वेद रुग्णालय, बारामती" असा फलक तसेच, रुग्णालयामध्ये आवश्यक तेथे आयुर्वेद रुग्णालयातील विविध विभागांचे व इतर संबंधित फलक लावण्याची परवानगी असेल.

८)	आयुर्वेदिक औषधी भांडार व वितरण यासाठी जागा निश्चित करुन देण्यात येईल.

९)	पंचकर्म (स्त्री-पुरुष) कक्ष स्थापनेकरीता वैद्यकिय अधिक्षक, शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती सहकार्य करतील.

१०)	शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती येथील सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या सुरक्षा, स्वच्छता, वस्त्रधुलाई, आहार व Bio Medical Waste या अवैद्यकीय सेवा, उक्त रुग्णालयाचे अंशत: हस्तांतरणानंतरदेखील, सदर सेवा ह्या १०० खाटांचे आयुर्वेद रुग्णालयाकरीता करार कालावधीपर्यंत सुरु ठेवण्यात याव्यात. करारनामा झाल्यानंतर शासकीय आयुर्वेद रुग्णालय संबंधी सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, वस्त्र धुलाई, रुग्ण आहार, रुग्णवाहिकेची व्यवस्था, वीज देयक, पाणी पट्टी, बायो-मेडिकल वेस्टचे व्यवस्थापन शुल्क तसेच नगरपालिका शुल्क इ. करिता येणारा खर्च करण्याची जबाबदारी शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती यांची राहील.

११)	या रुग्णालयातील कार्यरत यंत्रसामुग्री ही भारतीय चिकित्सा केंद्रिय परिषद, नवी दिल्ली / भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांचे मानकांनुसार आवश्यक असल्यास सदर वस्तू, यंत्र-साधनसामग्री हया शासकीय आयुर्वेद रुग्णालयास वापरण्यास परवानगी राहील. त्यावरील दुरुस्ती व देखभालीचा खर्च शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती यांनी त्यांचे निधीतून भागवावा.

वरीलप्रमाणे, आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय स्त्री रुग्णालय, बारामती येथील १०० रुग्ण खाटा व अनुषंगिक आवश्यक इमारतीचा भाग अंशत: हस्तांतरीत करण्याकरीता "सामंजस्य करार" करण्यात येत आहे.

वैद्यकिय अधिक्षक (वर्ग-१)
शासकीय स्त्री रुग्णालय,
बारामती

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय
व संलग्नित रुग्णालय, बारामती

Dean
Govt. ... College & Hospital
B..., Dist. Pune

Scanned by CamScanner

Accompaniment No.1 to letter No. B-88382 Dated 26/06/2013 issued by the Executive Engineer, MIDC, Baramati division Baramati- 413 133.

Addressed to : District Civil Surgeon, General Hospital.
For the Plot No : P-103, MIDC, Baramati.
Allotted to : District Civil Surgeon, General Hospital, Baramati, Dist.- Pune
Postal address : Plot No. P-103, MIDC Baramati, Tal- Baramati, Dist- Pune

Name of Architect	Name of unit
Satish Patil, Pune.	District Civil Surgeon, General Hospital Plot no. P-103, MIDC, Baramati Indl. Area, Baramati.

Details of Unit

Sr. No.	Name of Building	Ground floor area in m2	First floor area in m2	Second floor area in m2	Third floor area in m2
	Commercial Building				
1	Entrance Hall	873.60	887.89	---	---
2	OPD	--- (Parking)	1366.86 (stilt)	---	---
3	Hospital-Part One	1640.309	1640.309	---	---
4	Toilet Block	358.512	358.512	---	---
5	Hospital-Part Two	1640.309	1640.309	---	---
6	Nursing School	396.41	299.77	---	---
7	Quarters Type-2	225.28	225.28	225.28	225.28
8	Quarters Type-4	196.84	196.84	196.84	196.84
	Net Built up	5331.26	6615.77	422.12	422.12
	Total	12791.27 Sq. Mt.			

Details of Area now Approved.

Plinth area approved :- 5331.26 Sqm.

Built up area now approved :- 12791.27 Sqm.

F.S.I. Consumed. :- 0.32

APPROVED

(V. P. RUIKAR)
Executive Engineer
MIDC, Baramati Division,
Baramati

Note:- 1) Party has paid Rs 703530.00 (690730.00+12800.00) against Development & scrutiny Charges vide D.R. No. 054564 Dt. 05/04/2013.

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

Construction plan of Govt Ayurved Hospital
Baramati, Dist. Pune



Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune





Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune

SPECIFICATIONS

SCHEDULE OF OPENINGS







PARKING FLOOR PLAN

Dean
Govt. Ayurved College & Hospital,
Baramati, Dist. Pune